www.PapaCambridge.com

UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/04**

Paper 4 Texts **October/November 2011**

**2 hours 30 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer any **three** questions, each on a different text. You must choose **one** from Section 1, **one** from Section 2 and **one other**.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You may **not** take set texts into the examination.
You should write between 500 and 600 words for each answer.
You are advised to divide your time equally between your answers.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्वप्रथम खालील सूचना वाचा**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.
उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.
गडद निळ्या अथवा काळ्या पेनने लिहावे.
टाचणी अथवा टाचण्याची अन्य साधने, अधोरेखनासाठी रंगीत पेन, डिंक किंवा दुरूस्तीसाठीची साधने वापरू नयेत.

कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांवर आधारित असावा.
विभाग 1 मधून **एक** प्रश्न, विभाग 2 मधून **एक** प्रश्न व **उरलेला एक** प्रश्न कोणत्याही विभागातून सोडवा.
उत्तरांसाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.
शब्दकोशांचा उपयोग करण्यास **मनाई आहे.**
पाठ्यपुस्तके परीक्षेच्या वेळी नेता येणार **नाही.**
प्रत्येक उत्तर 500 ते 600 शब्दांच्या मर्यादेत असावे.
सर्व उत्तरांना समान वेळ द्यावा.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावी.
प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा उपप्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

DC (AC/AD) 31649/5
© UCLES 2011
UNIVERSITY of CAMBRIDGE International Examinations

**[Turn over**

www.PapaCambridge.com

## विभाग – 1

**1 संत ज्ञानेश्वर – सार्थ श्रीज्ञानेश्वरी – अध्याय अठरावा**
**(ओवी क्रमांक 1707 ते 1713)**

*म्हणौनि श्रीव्यासाचा हा थोरू। विश्वासि जाला उपकारू।*
*जे श्रीकृष्णउक्ती आकारू । ग्रंथाचा केला ।।*

*आणि तोचि हा मी आतां । श्रीव्यासाचीं पदें पाहतां पाहतां।*
*आणिला श्रवणपथा । मऱ्हाठिया ।।*

*व्यासादिकांचे उन्मेख। राहाटती जेथ आशंक।*
*तेथ मीही रंक एक । वाचाळीं करी।।*

*परी गीता ईश्वरू भोळा। ले व्यासोक्तिकुसुममाळा।*
*तरी माझिया दुर्वादळा । ना न म्हणे कीं।।*

*आणि क्षीरसिंधूचिया तटा । पाणिया येती गजघटा।*
*तेथ काय मुरकुटा । वारिजत असे।।*

*पांख फुटे पाखिरूं। नुडे तरी नभींच थिरू।*
*गगन आक्रमी सत्वरू। तो गरूडही तेथ।।*

*राजहंसाचें चालणें। भूतळीं जालिया शाहाणे।*
*आणिके काय कोणें। चालावेंचिना ।।*

**(अ)** **(i)** श्रीव्यासांचे ऋण ज्ञानदेव कशाप्रकारे मान्य करतात ?
**(ii)** व्यासांच्या प्रतिभेशी स्वतःची तुलना करताना ते कोणती उदाहरणे देतात ?
**(iii)** अठराव्या अध्यायात प्रकट केलेले गुरूकृपेचे महत्त्व स्पष्ट करा ? [25]

**अथवा**

**(ब)** अठराव्या अध्यायाच्या अखेरीस आलेल्या 'पसायदाना'चे मर्म साधार उलगडून दाखवा. [25]

www.PapaCambridge.com

**2 संत तुकाराम – सार्थ श्री तुकारामाची गाथा**
**(अभंग क्रमांक 1445 ते 1447)**

*धर्माचे पाळण । करणे पाखांड खंडण ।।*
*हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ।।*
*तीक्ष्ण उत्तरें । हाती घेउनि बाण फिरे ।।*
*नाही भीड भार । तुका म्हणे साना थोर ।।*

*निवडावे खडे। तरी दळण वोजें घडे।।*
*नाहीं तरि नासोनि जाय। कारण आळस उरे हाय।।*
*निवडावें तन । सेतीं करावें राखण ।।*
*तुका म्हणे नीत । न विचारितां नव्हे हित।।*

*दुर्जनाचा मान। सुखें करावा खंडण।।*
*लाता हाणोंनियां वारी । गुंडा वाट शुद्ध करी ।।*
*बहुतां पीडी खळ। त्याचा धरावा विटाळ।।*
*तुका म्हणे नखे । काढुनि टाकिजेती सुखें।।*

**(अ)** **(i)** आपल्या जीवनाचे कोणते ध्येय तुकाराम महाराज सांगतात ?

**(ii)** प्रस्तुत अभंगात दुर्जनांशी वागण्याची कोणती पद्धती तुकोबांनी प्रतिपादन केली आहे ?

**(iii)** 'तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेउनि बाण फिरे' या चरणांतून तुकोबा कोणता भाव व्यक्त करीत आहेत? [25]

**अथवा**

**(ब)** संत तुकारामांच्या नाममहात्म्यपर अभंगांची वैशिष्ट्ये अभ्यासक्रमातील अभंगांच्या आधारे स्पष्ट करा. [25]

www.PapaCambridge.com

**3 कुसुमाग्रज – कविता – हिमलाट**

*हिमलाट पहाटे पहा जगावर आली !*
*मुखि पिळून मद्यास्तव द्राक्षांचे घोस*
*पाडीत मळे मोत्यांचे चरणी ओस*
*उद्‌दाम धावते करित दुभंग धरेस*
*करकरा पाखरे रगडी दाताखाली*
*हिमलाट पहाटे पहा जगावर आली !*
*श्रीमन्त महाली तिथे हिला ना थारा*
*मखमाली दुलया देती मधुर उबारा*
*डोकावुन पळते कापत हीच थरारा*
*हो काय दरारा कनकाचा भयशाली*
*हिमलाट पहाटे पहा जगावर आली!*
*पाहून परन्तु कुठे कुडाची खोपी*
*कंगाल कांबळी टाकुन गेले झोपी*
*शेकडो कवाडे ! वाट जावया सोपी*
*कडकडून पडते तेथे लाव भुकेली*
*हिमलाट पहाटे पहा जगावर आली !*
*ज्योतीतुनि धावत या तेजःकण सारे*
*या यज्ञातिल अन् सरणातील निखारे*
*रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे*
*पेटवु द्या वणवा कणाकणात मशाली*
*हिमलाट पहाटे पहा जगावर आली !*

**(अ)** **(i)** हिमलाटेच्या आगमनाचे कोणते परिणाम निसर्गावर व जनजीवनावर झाले ?
**(ii)** 'हो काय दरारा कनकाचा भयशाली' या ओळीतील भावाशय स्पष्ट करा.
**(iii)** प्रस्तुत कवितेचे आशयसौंदर्य आणि त्यातील अभिव्यक्तिवैशिष्ट्ये विशद करा. [25]

**अथवा**

**(ब)** 'देव अजब गारूडी' या कवितेतून कवयित्रीने व्यक्त केलेल्या ईश्वरनिष्ठेचे आणि निसर्गनिष्ठेचे स्वरूप सोदाहरण उलगडून दाखवा. [25]

www.PapaCambridge.com

## विभाग – 2

**4 पु.ल.देशपांडे – नाटक – सुंदर मी होणार**

(अ) 'सुंदर मी होणार' या नाटकाचे मुख्य कथासूत्र तुमच्या शब्दांत साधार उलगडून दाखवा. [25]

**अथवा**

(ब) प्रस्तुत नाटकाचे प्रतिपाद्य संवादकौशल्यातून कसे प्रभावीपणे आकाराला आले आहे ? सोदाहरण विशद करा. [25]

**5 आशा बगे – कथासंग्रह – मारवा**

(अ) परंपरेच्या हस्तांतरणातील मानवी नात्यांचे आणि भावभावनांचे नाट्य 'मारवा' कथेतून लेखिका कशा प्रभावीपणे टिपत जातात? साधार स्पष्ट करा. [25]

**अथवा**

(ब) जीवनातील सुख–दुःखाच्या क्षणांची क्षणभंगुरता स्पष्ट करताना 'बेईमान'मधील माधवीच्या अंतर्मनाची आंदोलने लेखिका कशाप्रकारे व्यक्त करतात? [25]

**6 रणजित देसाई – कादंबरी – पावनखिंड**

(अ) एक ऐतिहासिक–चरित्रात्मक कादंबरी या अंगाने 'पावनखिंड' कादंबरीचे साधार वाड्.मयीन मूल्यमापन करा. [25]

**अथवा**

(ब) "बाजीप्रभू देशपांडे आणि इतर व्यक्तिरेखांच्या प्रभावी चित्रणातून 'पावनखिंड'चे कथानक आकाराला येत जाते." या विधानाची कादंबरीच्या आधारे साधकबाधक चर्चा करा. [25]

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of